# रूप : कवितेचे

संपादक

प्रा. डॉ. शिरीष लांडगे

प्रा. डॉ. भास्कर ढोके प्रा. डॉ. संदीप सांगळे



# अ नु क्र म


- संपादकीय | १३

- देविदास चौधरी

  काही हायकू | ३३

- प्रकाश होळकर

  असे कोणत्या | ३७

  माझे आभाळ | ३८

  भरू दे यंदा | ३९

- कमलाकर आत्माराम देसले

  कोठलाही स्वार्थ नाही | ४०

  तुलाच आळवल्यावर कळले | ४१

  मी शब्दांनी बोलत नाही | ४२

- सौमित्र

  त्याला पाऊस आवडत नाही | ४३

  दिस नकळत जाई | ४४

  बघ माझी आठवण येते का... | ४५

- मंगेश नारायणराव काळे

  लाकूडतोड्याची गोष्ट | ४८

  पाणी | ५०

  आत्महत्या | ५१

❑ प्रज्ञा दया पवार

मातीने ओसंडून गच्च वाहणाऱ्या | ५२

शो मी युवर जलवाँ | ५४

शांततेला आता आठवत नाही काहीच | ५६

❑ संतोष पद्माकर पवार

हिराबाई जाफरमियाँ | ५८

धुळवड | ६२

लंगळंग मचळंगऽऽ | ६४

❑ संदीप खरे

नसतेस घरी तू जेव्हा | ६५

आयुष्यावर बोलू काही | ६७

नास्तिक... | ६८

❑ नितीन भरत वाघ

ते तुला देव बनवत राहतील | ७०

या आकळलेल्या मुक्तीचं काय करायचं? | ७२

अफगाण : २००१ | ७४

❑ प्रवीण अक्कनवरू

रे टिमकीबहाद्दरा | ७६

आईला कळायच्या नाहीत माझ्या कविता | ७८

मी फेसबुकवर विचारी | ८०

❑ कवी परिचय | ८२

## काही हायकू

: १ :

कॉफी हाऊस
प्रत्येक टेबलाशी
नवा पाऊस

: २ :

नभात काळे
ढग तुडुंब वाजे
मातीला ओझे

: ३ :

भर उन्हात
दोघांना सावरत
छत्री रंगात

: ४ :

ऊन पडले
किर्र रानातून
पक्षी उडले

: ५ :

धुक्यात दाट
गावेना नेहमीची
पाऊलवाट

: ६ :

पक्ष्यांचे खेळ
झाडाच्या पानोपानी
बुडाशी ते दोन्ही

: ७ :

ढग ओसाड
रानभर उन्हाळा
मन उजाड

: ८ :

निरोप घेता घेता
आई पाणावून गेली
माझी ओंजळ ओली

: ९ :

थिएटरची गर्दी
भिकार नाटकाला
चिक्कार दर्दी

: १० :

रेडिओवर
भजनाचा सूर
घरात धूर

: ११ :

फांदी हलली
कावळ्याच्या खोप्यात
मैना बसली

: १२ :

तुडुंब तळ्यावर
रिकामीच तरंगतेय
नक्षीदार घागर

: १३ :

वासराचा हंबर
बया गलबलून गेली
झाली काचोळी ओली

: १४ :

धुकेच धुके
ओठ तडकून गेला
हिवाळा आला

: १५ :

स्वत:च्या रूपाला
आरशात बघून लाजते
काचोळी कसते

## प्रकाश होळकर

### १

### असे कोणत्या

असे कोणत्या दु:खाचे
दिस आले बाई
ओल असून मुळाशी
सारी पाचोळली भुई

उभ्या रचल्या सुडीला
लागे उकीर आतून
किती सारवले तरी
भुई खचते खालून

डोळां उन्हाचे कुसळ
आणि झळाया रानाला
कोंब फुटण्याच्या आधी
माती जाळते दाण्याला

## २

### माझे आभाळ

माझे आभाळ
तुला घे
तुझे आभाळ मला
आठवांच्या
पारंबीला
बांधू एक झुला

माझा झुला
तुला घे
तुझा झुला मला
वाऱ्यावर
पसरला
मखमलीचा शेला

माझा शेला
तुला घे
तुला शेला मला
माझे आभाळ तुला घे

## ३

### भरू दे यंदा

भरू दे यंदा मृगाचं आभाळ
नावाचा तुझ्या यळकोट करील

वाहू दे यंदा वहाळनाले
नावाचा तुझ्या यळकोट करील

पिकू दे यंदा खंडीभर रास
नावाचा तुझ्या यळकोट करील

भरू दे गाईगुरांनी गोठे
नावाचा तुझ्या यळकोट करील

-वाढू दे अंगावर मूठभर मांस
नावाचा तुझ्या यळकोट करील...

## १

## कोठलाही स्वार्थ नाही

कोठलाही स्वार्थ नाही
काय हा परमार्थ नाही?

मोह सर्वांनाच आहे
कोण येथे पार्थ नाही

एक साधू दाखवा मज
ज्यास कुठला स्वार्थ नाही

सांगणे आहे सटिक, तर-
का बरे मग सार्थ नाही

व्याकरण सांगितले, बस
बोलला भावार्थ नाही

अनुभवाचा बोल माझा
पुस्तकी वेदार्थ नाही

प्रेम ही आहे विवशता
प्रेम हा पुरुषार्थ नाही

## २

## तुलाच आळवल्यावर कळले

तुलाच आळवल्यावर कळले
जखमा सावळल्यावर कळले

पाणी म्हणजे अमृत असते
तहान भागवल्यावर कळले

तुझाच होतो, तुझाच राहील
तुलाच आठवल्यावर कळले

हे तर माझे वाचून झाले;
पुस्तक मागवल्यावर कळले

थंडीसुद्धा मानवते मज
थंडी मानवल्यावर कळले

दुःख सनातन, विदूषका, तू-
भरपूर हासवल्यावर कळले

मी हृदयाचे ऐकत असतो
डोळे पाणवल्यावर कळले

प्रेम किती मी करतो, हे ही-
तुलाच रागवल्यावर कळले

सदैव माझी आहेस हे, तू -
निरोप पाठवल्यावर कळले

उजेड असतो अंधारातच
उजेड मालवल्यावर कळले

## ३

## मी शब्दांनी बोलत नाही

मी शब्दांनी बोलत नाही
तू मौनाला ऐकत नाही

परमाणूहुन लहान होतो
नभात मग मी मावत नाही

मागून घेईल कुणी म्हणुनी
दुःख भरजरी सांगत नाही

पाहून होईल दुःख दुजाला
म्हणून तर मी हासत नाही

बदलणार जे नाही कधीही
त्या सत्याशी भांडत नाही

मी अश्रूंची शेती करतो
नभास पाणी मागत नाही

तुला सोडूनी कुणाकडेही
चुकूनसुद्धा पाहत नाही

तुझ्या मिठीची ऊब मिळावी
म्हणून स्वेटर घालत नाही

## सौमित्र

## १

### त्याला पाऊस आवडत नाही

त्याला पाऊस आवडत नाही, तिला पाऊस आवडतो.
ढग दाटून आल्यावर तो तिच्या तावडीत सापडतो.

मी तुला आवडते, पण पाऊस आवडत नाही,
असलं तुझं गणित खरंच मला कळत नाही.

पाऊस म्हणजे चिखल सारा, पाऊस म्हणजे मरगळ,
पाऊस म्हणजे गार वारा, पाऊस म्हणजे हिरवळ.

पाऊस कपडे खराब करतो, पाऊस वैतागवाडी
पाऊस म्हणजे गार वारा, पाऊस म्हणजे झाडी.

पाऊस रेंगाळलेली कामे, पाऊस म्हणजे सुटी उगाच,
पावसामध्ये गुपचूप निसटून मन जाऊन बसतं ढगात.

दरवर्षी पाऊस येतो, दरवर्षी असं होतं
पावसावरून भांडण होऊन लोकांमध्ये हसं होतं

पाऊस आवडत नसला तरी ती त्याला आवडते
पावसासकट आवडावी ती म्हणून ती ही झगडते.

रुसून मग ती निघून जाते भिजत राहते पावसात.
त्याचं तिचं भांडण असं ओल्याचिंब दिवसात

## २

### दिस नकळत जाई

दिस नकळत जाई, सांज रेंगाळून राही
क्षण एकही ना ज्याला, तुझी आठवण नाही ।।धृ.।।

भेट तुझी ती पहिली, लाख लाख आठवतो
रूप तुझे ते धुक्याचे, कण कण साठवतो
वेड सखी साजणी हे, मज वेडावून जाई ।।१।।

असा भरून ये ऊर, जसा वळीव भरावा
अशी हूरहूर, जसा गंध रानी पसरावा
रान मनातले माझ्या, मग भिजूनीया जाई ।।२।।

आता अबोध मनाची, अनाकलनीय भाषा
कशा गूढ गूढ माझ्या तळहातावर रेषा
असे आभाळ आभाळ दूर पसरून राही ।।३।।

## ३

## बघ माझी आठवण येते का...

मुसळधार पाऊस...
खिडकीत उभी राहून पहा...
बघ माझी आठवण येते का...

हात लांबव...
तळहातांवर झेल पावसाचं पाणी...
इवलंसं तळं पिऊन टाक...
बघ माझी आठवण येते का...

वाऱ्यानं उडणारे पावसाचे थेंब चेहेऱ्यावर घे...
डोळे मिटून घे... तल्लीन हो...
नाहीच जाणवलं काही... तर बाहेर पड...
समुद्रावर ये...
पाण्यात पाय बुडवून उभी रहा...
वाळू सरकेल पायाखालून...
बघ माझी आठवण येते का...

मग चालू लाग...
पावसाच्या अगणित सुया टोचून घे...
चालत रहा पाऊस थांबेपर्यंत...
तो थांबणार नाहीच...
शेवटी घरी ये...

साडी बदलू नकोस...
केस पुसू नकोस...
पुन्हा त्याच खिडकीत ये...
आता...
नवऱ्याची वाट बघ...
बघ माझी आठवण येते का...

दारावर बेल वाजेल...
दार उघड... नवरा असेल...
त्याच्या हातातली बॅग घे...
रेनकोट तो स्वत:च काढील...
तो विचारील तुला तुझ्या भिजण्याचं
कारण...
तू म्हण 'मन गळतंय्'
मग चहा कर... तूही घे...
तो उठून पंकज उधास लावील...
तू तो बंद कर...
किशोरीचं 'सहेला रे' लाव
बघ माझी आठवण येते का...

मग रात्र होईल...
तो तुला कुशीत घेईल...
म्हणेल 'तू मला आवडतेस'
पण तूही तसंच म्हण...
विजांचा कडकडाट होईल...
ढगांचा गडगडाट होईल
तो त्या कुशीवर वळेल...
त्याच्या पाठमोऱ्या शरीराकडे बघ...
बघ माझी आठवण येते का...

यानंतर सताड डोळ्यांनी
छप्पर पाहायला विसरू नकोस...
यानंतर... बाहेरचा पाऊस...
नुस्ता ऐकण्याचा प्रयत्न कर...
यानंतर... उशीखाली सुरी घे...
झोपी जाण्याचा प्रयत्न कर...
येत्या पावसाळ्यात...
एक दिवस, तरी
बघ माझी आठवण येते का...

## मंगेश नारायणराव काळे

१

### लाकूडतोड्याची गोष्ट

लाकूडतोड्याची गोष्ट
पुन्हा पुन्हा सांगितली जाऊ शकते

ती आजोबांनी, वडिलांना सांगितलेली असते
वडिलांनी आपल्याला
नि आपण मुलांना सांगितलेली असू शकते

म्हणजे वडिलांच्या किंवा आजोबांच्या गोष्टीतला
लाकूडतोड्या असू शकतो आपल्या
गोष्टीतल्या लाकूडतोड्याचा मुलगा किंवा नातूही परंपरेने

म्हणजे लाकूडतोड्याची गोष्टच
ती कायम असतेच असते
नि त्याची कुऱ्हाड विहिरीत पडलेली असते

देव येतो धावून लाकूडतोड्याच्या मदतीला याही वेळेला
नि एक अगदी तशीच कुऱ्हाड तांब्याची देतो काढून
तो ती आपली नाही म्हणतो परंपरागत

खरं म्हणजे तो आकारच असतो नुसता
लाकूडतोड्याच्या विहिरीत पडलेल्या कुऱ्हाडीचा
देव दुसरी काढून देतो रुप्याची तत्पर

हाही नुसता आकारच असतो
विहिरीत पडलेल्या लाकूडतोड्याच्या कुऱ्हाडीचा
तीही तो आपली नाही म्हणतो जंटलमन

प्रसन्न होतो देव लाकूडतोड्याच्या इमानावर
त्याची पडलेली कुऱ्हाड काढून देतो
नि सत्वर सगळ्या कुऱ्हाडीही देऊन टाकतो कृपाळू
लाकूडतोड्या परततो घरी
विहिरीत पडलेली कुऱ्हाड घेऊन
नि तांब्या, रुप्याची, सोन्याची कुऱ्हाड बक्षिसी म्हणून

खरं म्हणजे जो घरी परततो तो लाकूडतोड्या नस्तोच मुळी
आकार अस्तो नुस्ता लाकूडतोड्याचा
जो विहिरीत न पडताही सापडलेला असतो त्यालाच

लाकूडतोड्याची गोष्ट
पुन्हा पुन्हा सांगितली जाऊ शकते

## २

### पाणी

पाणी हा एक असा शब्दय जो काढता येतो
विहिरीतून, समुद्रातून, नदी-नाला, तलाव
किंवा फार फार तर घरातल्या माठातून सुद्धा

म्हणजे किती सहज होतं पाणी हा शब्द लिहिणं
म्हणजे थेट नळाला लावला तांब्या तरी
यायचं भरून क्षणार्धात पाणी हा शब्द

म्हणजे विहिरीत सोडलेला दोर हातभर
किंवा परतताना शेतातून घेता येत होतं
नदीवर पाणी भरून कळशीत अगदी सहज

म्हणजे खळाळ वाहत राहायचा पाणी हा शब्द
कुठेही कधीही केव्हाही विनासायास
नव्हतंच काही अवघड पाण्यात लपलेलं

नव्हती मैलोन्मैल भटकंती नव्हता खडखडाट
विहिरीच्या तळाशी रिकाम्या बादलीचा
नव्हती सुकली नाळ नळाची दूरवर पसरलेली

उडून गेलाय पाणी हा शब्द गावातून
नदीतून, विहिरीतून, थेट माठातून सुद्धा
गहाळ झालंय आद्याक्षर पाण्याचं

नि लिहिताच येत नाहीये
कुणालाच या सेंचुरीत

## ३

### आत्महत्या

आत्महत्या हा शब्द कुणीही लिहू शकतो
म्हणजे ज्याला गिरवता येते पहिले अक्षर
किंवा निरक्षर साक्षात ठसा अंगठ्याचा

म्हणजे कवी असेल पेंटर नट डोंबारी
तर लिहितोच लिहितो कैफात वळणदार
म्हणजे नर असेल किंवा मादी किंवा तृतीयपंथीसुद्धा

म्हणजे कुणीही लिहू शकतो
या पृथ्वीतलावर जन्माला आलेला
द्विपाद किंवा चतुष्पादही डोळस

म्हणजे आत्महत्या हा असा एकमेव शब्दच
जो लिहिता वाचता येण्यासाठी
अटच नाहीये साक्षर असण्याची

नि आता आताशा तर निरक्षरच सारे
मातीतून घाम पिकवणारे कष्टी
लिहू लागलेयत वळणदार आत्महत्या हा शब्द

म्हणजे प्रतिशब्दच शोधून काढलाय
या निरक्षरांनीच आत्महत्या या शब्दाला
जो लिहिता किंवा वाचण्याचीही नसते गरज कधीच

आत्महत्या हा शब्द
आता शेतकरी असाही लिहिता येतो

## प्रज्ञा दया पवार

### १

### मॉलने ओसंडून गच्च वाहणाऱ्या

कवी म्हणा
अथवा कवयित्री
काहीही संबोधा,
पण, खरंच
त्यांच्या असण्याने
काय काय घडायचं थांबतं?
किंवा
काय काय घडणं सुरू होतं?
आताशा सतत पडणारा हा प्रश्न
कवयित्री विचारते स्वत:ला
मॉलने ओसंडून गच्च वाहणाऱ्या
वर्तमानातून हिंडताना

आधी ती ठाम असायची
खोलवर विश्वास असायचा तिला
की बदलेल जग
याहून निराळं असेल वास्तव
असेल स्वप्नाचा एक दरवाजा
सताड उघडलेला :
जिथं प्रत्यक्षात उतरलेलं असेल

अपार कोवळिकीने भरलेलं
ऊन
असेल सर्वांनाच अर्धी चतकोर का होईना
भाकर, देहाभोवती पटकूर
आणि माथ्यावर
बिनघोर छप्पर,
कविता असेल
विचारांइतकी भरभक्कम,
मूल्यांची झिनी झिनी चादर
अवघ्या जगण्यावर पांघरलेली,

उत्कटपणे कवयित्री
लिहायची जे शब्द
ते फोडून थेट आत पोहचायची,
अनुभवांचा लसलसता कंद सोलून,
जगणं लिहिण्याला थेट भिडवत,

अजूनही वळवता येईल?
कष्टकऱ्यांच्या यातनेचा
नि भणंगाच्या वेदनेचा दाह
कवितेच्या मुळाशी?
कविता निरर्थक ठरवल्या जाणाऱ्या
इंडिया शायनिंगच्या चकचकीत पडद्यावर
कवयित्री विचारते स्वत:ला
आणि मुकाट
मुकाट होते
मॉलने ओसंडून गच्च वाहणाऱ्या
वर्तमानात हिंडताना.

## २

## शो मी युवर जलवाँ

याच्या गळ्यात अडकवलंय मडकं,
याच्या मेंदूत रोवलीय गुलामीची रोपं,
ढुंगणाला बांधलाय गच्च खराटा,
हा झाडतोय कार्यकारणाचा फुफाटा.

हा घेतोय अभ्यास-वर्ग,
हा उचंबळतो दीडशे-दोनशे चॅनल्सच्या हुदयाबरहुकूम!
दिसावं कसं?
बोलावं कसं?
हसावं कसं?
हा दाखवतो झुळझुळतं फ्रेश दृश्य
अँगलसकट बदलणारं सोफिस्टिकेटेड लिडबिडाटात.

जिवंत तरळतो तो
सोमालियातल्या भूकबळीत
इराकच्या बेचिराखीत
अमेरिकेच्या बुलिमियात

हा विहरतो,
रामदेवबाबाच्या केसाळ छातीत
नि एकता कपूरच्या करवाँचौथ सिरयलीत

याने भूतकाळावरून फिरवलेत रोड-रोलर
बाजीराव नाना अहो बाजीराव नाना
तुंबडीभर दयाना
अहो बाजीराव नाना!

यानं पुसलेत अधिनायक
पुसला रायरंद
पुसला सोंगाड्या
पुसला नाच्या
पुसला नाचवणारा

नेणिवेचा कप्पा
अमानुष कापून काढलेल्या,
इतिहासाच्या पानापानातून
रिप्लेस केलेल्या,
हे अधिनायका
शो मी युवर जलवाँ!

## ३

## शांततेला आता आठवत नाही काहीच

शांततेला आता आठवत नाही काहीच
कसा होता आपला आवाज?
चेहरा रंग रूप?
कसे होते
शरीराच्या
अनाहत प्राकृताचे तपशील?

शांततेला आठवत नाही
कसं नष्ट होत गेलं
अवघ्या अस्तित्वाला
व्यापून असणारं
अमर्याद असीम बुद्धपण

काहीच आठवत नाही
शांततेला
कसं भगदाडात रूपांतर
होतं गेलं आपलं
सु-रचित
निर्मम

जिवाच्या आकांताने पळत सुटलेली भाषा
तडफडत्या हिंस्त्र नासाडीतून
कसेबसे बचावलेले
जिवंत उच्चार
आठवत नाहीत शांततेला

कुठून आल्या झुंडीच्या झुंडी
तोंडाला रक्त लागलेल्या
आणि बदलत गेलं
व्यामोह
पोस्ट-मॉर्डन गुहेत

नाही आठवत शांततेला

# १

## हिराबाई जाफरमियाँ

१.

हिराबाई सापडलीस तू जाफरमियाँला
तुळजापूरच्या भवानी मंडपात
जाफरमियाँ होता भटकत
आपल्या हिंदू मित्रांसमवेत करीत तीर्थयात्रा

मित्रांना सोडून देऊन तुझ्यासाठी
काही काळ थांबला तिथं
आणि आला घेऊन तुला
त्याची पाच लेकरं सांभाळण्यासाठी
लजपतवाडीला...
जाफरमियाँची बायको नव्हती जगात
अनाथ ननग्या लेकरांची तू
अचानक झाली पाचांची माय
आफरीन, आमरीन, अरमान
इसहाक आणि धाकला दूधपिता लालमहंमद
खजुराच्या झाडाला नारळ लटकवावं
तशी तू झालीस हिराबाई जाफरमियाँची बिवी

२.

रितसर झालीस तू मुसलमानीन अर्ध्या उमरीत
आणि पढू लागली कलमा
आलिफ बे...
खोकत खोकत रोज यायचा म्हातारा मौलवी
तुला कुराण शिकविण्यासाठी
तुझी तालीम नि माझी शाळा
एकाच वेळी होती चालू
दोघं बसायचो पाटी घेऊन अंगणात
आणि तू पढायचीस कलमा तुझ्या अदाकारीनं
अन् विचारायचीस, 'जमला का संतोस कलमा मला?'
मी हो म्हणायचो नकळून
आणि मी घोकून दाखवायचो तुला
'मला आवडते वाट वळणाची'
आणि तू ढसकन रडायची काहीतरी जुने आठवून

३.

तुझ्या त्या पाचांची म्हणे शिक्षणं,
नवकरीपाणी, त्यांना रांकला
लावून तू लावल्यास त्यांच्या शाद्या
आणि पाची गेल्ते देशोधडी तुम्हा दोघांना सोडून...
लिंपणातून माती निसटून पडावी
भिताडीचा पोपडा वारंवार गळून पडावा
तशी तू झाली होतीस जाफरमियाँच्या घरात
जाफरमियाँ दमेकरी खोकल्यानं जाम व्हायचा

नि त्याचा घाबराघुबरा चेहरा होऊन जायचा
तू बुढ्यासाठी धावायची दवापाणी आणायला
पाचानी बापमाय खाटल्यावर जाय
तुझा कळवळायचा जीव
नि सांगितलीस कहाणी एक दिशी तू
तुझी जाफरमियाँच्या आयुष्याची

४.

जाफरमियाँ लजपतवाडीचा जहागीरदार
नि एवढ्या तेवढ्या झगड्यावरून
जोरूच्या भावांशीच तंटला
चाकू-सुऱ्या निघाल्या
'सब दुनिया एक तरफ जोरूके भाई उस तरफ'

रामनवमीच्या यात्रेहून परत आलेला जाफरमियाँ
नि त्याची बिवी वैदा झोपलेते
पाच लेकरांना मधोमध घेऊन
अंगणात पांघरूण ओढून
नि जाफरमियाँ समजून
ध्याराती चालल्या तलवारी-
जोरूच्या भाईंच्या
पांघरूण घेतलेल्या अंगावर आंधळ्यासारख्या
पण जागा चुकली होती
नि सख्खी बहीणच
तलवारीच्या पात्याखाली आली होती!

कोणीच नाही आलं समजुतीला जातजमातीचं
नि जाफरमियाँला सापडला आसरा हिराबाईचा
गेली भरपूर सालं नि पूर वसरलेल्या
काडी-कचऱ्यागत उरली हिराबाई नि जाफरमियाँ

तोही झाला एक दिस पैगंबरवासी
नि तुला ज्या मौलवींनी दिल्ती
इस्लामची शपथ, तोही नाही राहिला जगती

५.

आता तू पुन्हा तुळजापूरच्या भवानीसमोर
सौभाग्याचं कुंकू हिरवे चुडे विकीत बसलेली
तुझी एकच विचारणा होती मला
अख्खी वीस वर्षांनी भेटल्यावर-
'संतोसभाऊ,
मला मेल्यावर लोक जाळतील का
पुरतील रे?
माझं नाव नोंदून बघना
तुझ्या गावच्या कबरस्तानात
नि सांग असासं झाल्तं म्हणून..

## २

### धुळवड

गावात पोर पाण्याला गेली वाटेत गुंडा टाकून आली
धुळवडीचा दिवस होता रंगानं पोर माखून गेली

येताच घरी चिडला बाप मायनं तिला मारलं खूप
बंदव काढी कुऱ्हाड काठ्या गावात देती टग्यांना चोप
लाख मोलाची आबरू म्हणे मातीला पार मिळून गेली
धुळवडीचा दिवस होता रंगाने पोर माखून गेली

डोईचा गुंडा धरून पोर गुमान कशी चालली होती
लांबून आली रंगेल टोळी रंगाची फेक करत होती
मारली कुणी पिचकारी ती जन्माला डाग पाडून गेली
धुळवडीचा दिवस होता रंगानं पोर माखून गेली

साखरपुडा झालेला तिचा दावण तिची ठरली होती
नवती पोर वायाला गेली खबर अशी सासरी होती
वाहून गेलं शेणाचं घर मेणाची माती वितळू गेली
धुळवडीचा दिवस होता रंगाने पोर माखून गेली

दुषणी रंग झालेत गोळा साऱ्यांनी केला काळोख काळा
कुवारमांड राहिली पोर जगणे झाले चोळा की मोळा
लागण्याआधी हळद अंगा हाउस तिची फिटून गेली
धुळवडीचा दिवस होता रंगानं पोर माखून गेली

भेटते आता गावात एक म्हातारी तिची कहाणी सांगे
रंगानं केली बेरंग पोर ऐकून जीव आढ्याला टांगे
रंगपंचीम खेळत कोणी दगड त्याला मारून गेली
धुळवडीचा दिवस होता रंगानं पोर माखून गेली

## ३

### डंगळंग मचळंगऽऽ

रातीला भजनात बसून गुंगल्यावर
कीर्तनात डोलून निघाल्यावर
पार उदार होतं माणूस आतून
वाटतं कुणाचंबी चांगलंच व्हावं
आपल्या हातून
कुणाच्या शेर दिडकीला नको वाटतं लाचार व्हायला
वाईट धंदे सोडूनच देऊ म्हणतो
आभाळाएवढं झालं काळीज गपगुमान
जातं झोपून रातीला

सकाळीच उठून आवरून सावरून
मारुतीचं दर्शन घेऊन पारावर यायचा
अवकाश आन् सकाळीच
पयला सलाम घेता-देताच
भजनाआधी गाडलं गेलेलं
भूत आपोआपच होतं जागृत
नित्याच्या धंद्याला होते सुरुवात
दिवसाउजेडी सुरू होतो मनात हैदोस

डंगळंग मचळंगऽऽ डंगळंग मचळंगऽऽ

## संदीप खरे

### १

### नसतेस घरी तू जेव्हा

नसतेस घरी तू जेव्हा
जीव तुटका तुटका होतो
जगण्याचे विरती धागे
संसार फाटका होतो

नभ फाटून वीज पडावी
कल्लोळ तसा ओढवतो
ही धरा दिशाहीन होते
अन् चंद्र पोरका होतो

येतात उन्हे दाराशी
हिरमुसून जाती मागे
खिडकीशी थबकून वारा
तव गंधावाचून जातो

एकाकी केविलवाणा
मी घरभर भिरभिर फिरतो
घुमघुमत्या आवाजाने
भिंतींना हाका देतो

तव मिठीत विरघळणाऱ्या
मज स्मरती लाघववेळा
श्वासाविन हृदय अडावे
मी तसा आकंतिक होतो

तू सांग सखे मज काय
मी सांगू या घरदारा?
समईचा जीव उदास
माझ्यासह मिणमिण मिटतो

ना अजून झालो मोठा
ना स्वतंत्र अजुनी झालो
तुजवाचून उमगत जाते
तुजवाचून जन्मच अडतो !

२

## आयुष्यावर बोलू काही

जरा चुकीचे जरा बरोबर बोलू काही
चला दोस्त हो आयुष्यावर बोलू काही
जरा चुकीचे जरा बरोबर बोलू काही
चला दोस्त हो आयुष्यावर बोलू काही...

उगाच वळसे शब्दांचे हे देत रहा तू
भिडले नाही डोळे तोवर बोलू काही
चला दोस्त हो आयुष्यावर बोलू काही...

तुफान पाहून तीरावर कुजबुजल्या होड्या
पाठ फिरू दे त्याची नंतर बोलू काही
चला दोस्त हो आयुष्यावर बोलू काही...

हवे हवेसे दु:ख तुला जर हवेच आहे
नको नकोसे हळवे कातर बोलू काही
चला दोस्त हो आयुष्यावर बोलू काही...

उद्या उद्याची किती काळजी बघ रांगेतून
परवा आहे उद्याचं नंतर बोलू काही
चला दोस्त हो आयुष्यावर बोलू काही...

शब्द असूदे हातामध्ये काठी म्हणूनी
वाट आंधळी प्रवास खडतर बोलू काही
चला दोस्त हो आयुष्यावर बोलू काही...

जरा चुकीचे जरा बरोबर बोलू काही
चला दोस्त हो आयुष्यावर बोलू काही...

## ३

### नास्तिक...

एक खराखुरा नास्तिक जेव्हा देवळाबाहेर थांबतो,
तेव्हा खरं तर गाभाऱ्यातच भर पडत असते
की कोणीतरी आपापल्यापुरता सत्याशी का होईना,
पण प्रामाणिकपणे चिकटून राहिल्याच्या पुण्याईची!

एक खराखुरा नास्तिक जेव्हा देवळाबाहेर थांबतो
तेव्हा शक्यता होते निर्माण
देवाने आपला आळस झटकून देवळाबाहेर येण्याची!

एक खराखुरा नास्तिक जेव्हा देवळाबाहेर थांबतो
तेव्हा कोऱ्या नजरेने पाहत राहतो
सभोवतालच्या हालचाली, भाविकांच्या जत्रा...
कोणीतरी स्वत:चे ओझे स्वत:च्याच पायांवर
सांभाळत असल्याचे समाधान लाभते देवालाच!

म्हणून तर एक खराखुरा नास्तिक जेव्हा देवळाबाहेर थांबतो
तेव्हा देवाला एक भक्त कमी मिळत असेल कदाचित,
पण मिळते आकंठ समाधान एक सहकारी लाभल्याचे!

देऊळ बंद झाल्यावर एक मस्त आळस देऊन
बाहेर ताटकळलेल्या नास्तिकाशी गप्पा मारता मारता
देव म्हणतो, 'दर्शन देत जा अधून मधून...
तुमचा नसेल विश्वास आमच्यावर,
पण आमचा तर आहे ना!'

देवळाबाहेर थांबलेला एक खराखुरा नास्तिक
कंटाळलेल्या देवाला मोठ्या मिन्नतवारीने परत पाठवतो देवळात
तेव्हा कुठे अनंत वर्षे आपण घेऊ शकतो दर्शन,
आस्तिकत्वाच्या भरजरी शालीत गुदमरलेल्या देवाचे...

एक खराखुरा नास्तिक जेव्हा देवळाबाहेर थांबतो...

## नितीन भरत वाघ

### १

### ते तुला देव बनवत राहतील

ते तुला देव बनवत राहतील
मी तुझ्यातला माणूस विसरू देणार नाही
तो ठेवेल शिल्लक
खरवडून शेंदूर
तुझ्यावरचा-

तुला बसवला मखरात सजवून धजवून तरी
पुस्तकातला तू मांडत राहीन जीवाच्या आकांताने
समोर करेन आरशासारखा तुझ्यासमोर

प्रेषितही होऊ देणार नाही मी तुला
तुझे शब्द अमीट अभेद्य अपरिवर्तनीय
नाही होऊ देणार - तुझ्या सागराला डबकं

माणूस असशील तोवर पोहचू तुझ्यापर्यंत
असशील साध्य आम्हाला
एकदा की मंदिरात प्रतिष्ठापित झालास की
तुझ्या कळस-शिखराचंही दर्शन केलं तर
फोडतील डोळे -

उच्चारला शब्द तू लिहिलेला तर जिभा हासडतील
बिनदिक्कत
किंवा ऐकला तर कानावाटे मेंदू उपसून काढतील
पायरीत गाडतील सर्वांत शेवटी
पाय ठेवण्यासाठी
तुझ्या पायरीचा दगड होऊ नये
याची काळजी घेत राहणारे मी

कायमचा पंगू करण्याचा डाव असू शकतो
प्रेषित बनवणं
सावध व्हावं सुसाट सुटावं सुट्टी घेऊन
असावं अळवावरच्या थेंबासारखं निसरडं
गळ्यात घालतायत तो हारये की फांसी का फंदा?

फंदफितुरीपासून लांब रहायचं तर जाऊ नये जवळ
डोंगर पायथ्याशी
मातीचे तर पाय असतात
डोंगराचेही

पाशच असतात मोहमयी
सळसळतात नागिणीच चंदेरी
आवळतात लख्ख दिवे ओवाळणारे
सावध असावं
केसांपासून
देवाचा पुत्रही सुटत नाही
दैवी पाशातून
सैतानाच्या

## २

## या आकळलेल्या मुक्तीचं काय करायचं?

धरताही येत नाही सोडताही
मानगुटीवर बसलेली
फासासारखी
जगूही देत नाही मरूही
श्वासात अडकलेली श्वासासारखी
रोखते सोडते
मुक्तीच्या कोलाहलात समष्टीचा छळ
धड इकडे ना धड तिकडे
येऊ देणारी ना जाऊ देणारी
माया व्यामोहाच्या झुल्यावर
त्रिशंखू चलिंदर
अस्तित्व वास्तवाचे क्षणैक
चांदणचकवा भरदिवसा
या आकळलेल्या मुक्तीचं काय करायचं
कळत नाही
धन्याचा माल
मग मी का हमाल
भार वाही?
व्हावा ज्याचा त्याचा
पाण्यात बसून तहानलेला

भुकेला पिकात
भुललेल्या भुलीला भुलक्कड
पुरावा न उरावा मोह क्षणैक
फसवी असते मुक्तीचा माया
अगोचर द्विमितीय
कळेना कळेना
पूर्ण काहीच नाही पूर्णत्वास
अपूर्ण चाकव्यूह
अर्धवट गोष्ट ऐकलेल्या गर्भात
राजकुमाराची
आणि फसवा सिसिफस
वाहत कूस माथ्यावर चंद्रबिंबी

मुक्ती करत नाही मुक्त
स्वत:च्याच जंजाळातून
इतक्या सहजी-
आकळून आवळते कवळते
निवळते मुक्तपणे

## ३

### अफगाण : २००१

बामियानचा उद्‌ध्वस्त बुद्ध बघतो
हसऱ्या डोळ्यांनी
त्याचीच प्रतिमा असंख्य डोळ्यांत
विझत जात असताना गोळ्यांत

बुद्धाचं अस्तित्व शून्य शून्य शून्य
उद्‌ध्वस्त बुद्धाच्या डोळ्यात उगवतात
टेररिस्ट काल आज आणि उद्याचे
दबा धरून बसलेले सुप्तपणे

बुद्ध बघत नाही कुणाकडेही
मागत नाही मुक्ती मागत नाही ज्ञान
कुठल्याही बोधीवृक्षाखाली
सावल्याळतो टेररिस्टांवर टेररिस्टांसारखा

त्रिसूत्री हिंसा
रक्ताळलेले बुद्धाचे डोळे रक्ताळलेले बुद्धाचे हात

स्वत:च्याच खुनाने बुद्धाचे खुनी हात
प्रसवतात टेररिस्ट

उद्‌ध्वस्त बुद्धाचे क्लोन असतात धर्माळलेले
उद्‌ध्वस्त बुद्धाच्या उसन्या डोळ्यात टेरर

डॉ. डी. बी. कोळगावी
सिन्नर

उद्ध्वस्त बुद्धाच्या डोळ्यातून पसरते धुराळी आग
जाळत सुटते जग मनोरे बुद्ध

उद्ध्वस्त बुद्ध निद्रिस्त असतात
एकेसत्तेचाळीस न्युक्लिअरवेपन्स मशिनगन्स ह्युमनबॉम्बमधे

उद्ध्वस्त बुद्ध पसरतो
आकाश बनून प्रकाश बनून अंधार बनून
उद्ध्वस्त बुद्ध डोळ्यात नाश घेवून उभा
सहस्त्रकाच्या उंबरठ्यावर

## प्रवीण अक्कनवरू

### १

### रे टिमकीबहाद्दरा

गवसलाय का तुला दहावा रस, अकरावी दिशा
किंवा आठवा स्वरतरी आजतागायत

सापडलीये का कितव्यानंतरची कितवीतरी मिती
या आकळली आहे
अविश्रांत फिरणाऱ्या जगाची खरी गती

गेलाबाजार लागलाय का हाती एखादा
नवा वर्ण किंवा नवी संवेदना तरी

का करतोस तरी वल्गना
करंगळीवर अवघ्या विश्वाचा पसारा तोलल्यागत मग

तुला थेरॉटिकली अवगत आहे बुद्धाची करुणा
मुखोद्गत आहे ज्ञाना-तुक्याची प्रतिभा

तू कोळून प्यायले आहेत सगळे वाद- अन्-शास्त्रही
अन् शोषली आहेत तत्त्व-बित्यं मूर्तिमंत बांडगुळाच्या निष्ठेने

पेटत्या ज्ञानकुंडाची शेकत राहिलास, तुझं तर काहीच जळलं नाही
वार हवेतले हवेतच विरले, तुझं टिपूसही भळभळलं नाही

मूलभूत मूलभूत म्हणतोस तेव्हा
तू फुलवत असतोस पूर्वसुरींच्या सेंद्रिय खतावर
स्वत:च्या हायब्रीड इंटप्रिटेशन्सचे मळे केवळ

बाकी
तुझं असं काय आहे?
तुझं असं काय आहे?

२

## आईला कळायच्या नाहीत माझ्या कविता

आईला कळायच्या नाहीत माझ्या कविता
तरी ती द्यायची तोंडभरून आशीर्वाद
डोळ्यांतून ओसंडून व्हायची तिच्या
न आकळलेली सापेक्षा समीक्षा

'आई' असण्याचे भोग म्हणून
मी हसायचो खुद्‌कन, तिच्यावरही

अन् त्या शून्यसमयी अचानक
लख्ख झालं सगळं...

नाळ कापताना किलकिल्या डोळ्यांनी पाहिला होता
तिने तिच्याच स्वागताचा शोक,

हाडं मांस रुंदावत गेलं म्हणून वाढत राहिली
निसर्गाच्या प्रतिभेला अर्धपोटी साद देत राहिली

तिच्या आईला बाप अन् बापाला आई होता नाही आलं
ऐतिहासिक अभावाभोवती तिनं आपसूक संस्कारांचं गाणं रचलं

गद्य नवऱ्याच्या परंपरागत अमानुषतेभोवती
रचता आली आहे त्याला माणसात आणणारी रुपकं किती

नव्हतं तिच्या सलगच्या दोन दिवसांनी साधलं कधी यमक वा अनुप्रास,
नजरेतून कायमच ओसंडत राहिला मुक्तछंद तिच्या उदास

दु:ख साचे अगणित पिढ्यांचं; माजता अंतरंगी दुही
साधला निष्फळ विद्रोह प्रसंगी झुगारून आईपण, बाईपणही

आई आयुष्यभर कविताच तर करत होती मला न दिसणारी
आणि ती आतातरी मला कळावी म्हणून; शेवटी

लिहावं लागलं तिला तिचंच मृत्युसूक्त!

## ३

### मी फेसबुकवर विचारी

मी फेसबुकवर विचारी
ट्विटरवर आक्रमक
इंस्टावर देखणा
आणि टिंडरवर रंगेल आहे...
अस्तित्वाची समयोचित शकलं करून
जागोजागी पेरली आहेत मी, व्यवस्थित
माध्यमांत विरघळलेल्या समाजाच्या
मागणी-पुरवठा तत्त्वावर

व्हॉट्सएपवरच्या थोतांडाचं वजन वाढवतो कधी कधी
मनोहारी दंतकथेवर हुबेहूब सत्यान्वेषाचा
बेमालूम मुलामा चढवून
किंवा
जीव तोडून करतो प्रतिवादही
मला न आवडणाऱ्या असत्याचा

पब्लिक मेमरीसारखी
कापरागत उडून जाणारी स्नॅपचॅटवरची तथ्ये
चाळवतात माझ्यातलं ॲनिमल इन्स्टिंक्ट वरचेवर
अन् शब्दांचे भाले खुपसत
रक्तबंबाळ करणारे ट्रोलर्सचे जत्थे

भासतात मला एका नाळेने जोडल्यागत आपलेसे
किमान अर्ध्या वेळा तरी

मी लिहितो, मी भेकतो
मी मिरवतो, मी रेकतो
दरवेळी अधीर, बहुतेकदा बधिर
बोचणारं खोटं बोलतो,
सुखावणारं खोटं बोलतो,
सुखावणारं खोटं ऐकतो,
गहिवरतो, चिडतो, रडतो
दातखीळ बसून, मुठी आवळून
स्क्रीनवरती उडत राहतो, उडत राहतो

मुसक्या आवळून असंख्य रात्री कोंडल्याचा
नसलेला भूतकाळ स्मरत
कंदिलातून बाहेर पडल्यासारखा
उगाचच खणत जातोय
विनाकारण खणतच राहतोय

अलबत, मी आजन्म ग्राहक आहे इथला
पण मी आहे उत्पादक, होलसेलर अन् रिटेलरही
धारणांच्या झुलत्या काट्यानुसार
अल्गोरिदमच्या अतिमानवी रेट्यानुसार
बहरहाल,
मीच तर साला उत्पादन आहे
या तंत्रोद्धारीत अनाकलनीय सांस्कृतिक संकराचं,
एक-शून्याचे मूर्तरूप दिलेल्या एकविशीय अपरिहार्यतेचं
वर्तमानातच धूसर भासणाऱ्या या 'समकाल' नामक आख्यायिकेचं